नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३४ Issue - 34 | वार शुक्रवार दि. २० जून २०२५ Blow- Friday Date 20 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## राठोडची नवीन भानगड, वीस टक्के द्या बिल घेऊन जा

### अक्कलकोट पाणी पुरवठा उप अभियंता राठोड यांचे चौकशीसाठी समिती गठन केल्याचे समजताच बचावासाठी अनेकांना कॉल करून बातमी थांबविण्याचे प्रयत्न व शेवटी मुंबई-मुंबई वारी करून ही थकला...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : विशेष प्रतिनिधी

अक्कलकोट पाणी पुरवठा विभाग मध्ये रोज नवीन नवीन किस्से बाहेर येत असून दोन सदस्य समिती चौकशी करणार



कळताच उप अभियंता राठोड यानी मुंबई वारीला गेलंय, सूत्रांनी दिलेल्या माहिती प्रमाणे मी गेल्या दहा वर्षाच्या कार्यकाळात असेल खूप बातमी बघितले आहे मंत्रालयात माझं माणूस आहे चौकशी समिती कसे नेमणूक करतात बघू म्हणून मुंबई वारी केल्याचे माहिती समोर आले आहे

सांगली आडपाटी येथून अक्कलकोट येथे मी पंधरा वीस लाख देऊन बदली कशाला करून घेतलो आहे मला पैसे कमविण्याची असून काम कसे ही करा एम बी मी स्वतः लिहितो जे ई सहीचे गरज नाही सगळ मीच करतो मला वीस टक्के द्या असे राठोड बोलून कामाची पाहणी न करता ऑफिस मध्ये बसूनच एम बी लिहीत आहे जेव्हा सदर पाणी पुरवठा विभागाचे वृत्त मालिका सुरुवात झाले तेव्हा उप अभियंता राठोड यांची टागा पलटी घोडा फरार झाल्या सारखे अवस्था झाले आहे

जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा कामामध्ये अनेक ठिकाणचे कामे अनियमिता झाले असून अनेक गावात निकृष्ट दर्जाचे कामे होऊन देखील त्याचे बील स्वतः राठोड लिहून काढले आहे या कार्यालयाची अवस्था असे झाले आहे की राजा ही मीच , प्रधान ही मीच, शिपाई ही मीच हम करेसो कायदा असे कामकाज चालू आहे. अनेक कामे इस्टिमेटप्रमाणे झालेले नसून बिल मात्र इस्टिमेटप्रमाणे

**भाग - ३**

रेकॉर्ड करून एम बी तयार करून देत आहे आत्ता चौकशी समिती येणार म्हणून पूर्ण पणे पाय खालचे वाळू घसरत आहे अनेका कडून कॉल करण्यास लावून दबाव देण्याचं प्रयत्न करीत आहे जर सदर उप अभियंता धुतल्या तांदळा सारखं स्वच्छ असेल तर चौकशीला समोर येण्यास का घाबरत आहे अंदाजपत्रक आणि झालेल्या कामाचे एम बी व




प्रत्यक्ष काम याची एकादा होऊन जाऊ दे चौकशी दूध का दूध , आणि पाणी का पाणी जनतेला कळेल

## अरण्यऋषी पद्मश्री मारुती चित्तमपल्ली यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार



**पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पद्मश्री चित्तमपल्ली यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त श्रद्धांजली वाहिली**

सोलापूर : पद्मश्री अरण्यऋषी श्री मारुतीराव भुजंगराव चित्तमपल्ली यांचे १८ जून २०२५ रोजी सायं ७.५० वाजता वयाच्या ९४ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले होते. आज अक्कलकोट रोडवरील सूत मिल हेरिटेज मनिधारी एम्पायर सोसायटी येथील निवासस्थानापासून त्यांची अंत्ययात्रा निघाली. त्यांच्यावर रूपा भवानी मंदिराजवळील हिंदू स्मशान भूमी येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलीस विभागाच्या वतीने बंदुकीच्या तीन फैरी हवेत झाडून श्री चित्तमपल्ली यांना मानवंदना देण्यात आली.



यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पद्मश्री मारुती चित्तमपल्ली यांच्या पार्थिवावर पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस आयुक्त एम. राजकुमार व उपस्थित लोकप्रतिनिधी यांनी श्री चित्तमपल्ली यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र वाहिले व दर्शन घेतले.

यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सामाजिक वनीकरण चे अजित शिंदे, मनीषा पाटील यांच्यासह अन्य मान्यवर तसेच त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक, साहित्यिक, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## जे राज्याच्या मनात आहे तेच मी करेन : उद्धव ठाकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या वर्धापन दिन सोहळ्यात मनसे सोबतच्या युतीसंदर्भात सकारात्मक असल्याचे संकेत दिले आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसोबत युतीचा पर्याय अजून खुला असल्याचे संकेत उद्धव ठाकरे यांनी दिले. शिवसेनाप्रमुखांच्या ब्रँडचा उल्लेख करुन आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या दृष्टीनं उद्धव ठाकरेंनी एक पाऊल पुढं टाकलं आहे. जे तुमच्या मनात आहे, जे महाराष्ट्राच्या मनात आहे तेच करायला तयार आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

ही लढाई केवळ उद्धव ठाकरेंची नाही, शिवसेनेची नाही. १९६० साली ज्या मराठी माणसानं बलिदान देऊन, रक्त सांडून मुंबई मिळवून दिली, त्या मुंबईचं महत्त्व खत्म होऊ देणार नाही म्हणून उभं राहिलो तर मुंबई वाचेल, असं उद्धव ठाकरे म्हणाले. बातम्या सगळीकडे चालू आहेत, काय होणार, कसलं, नाही होणारं का? होणार की नाही होणार कळेल ना,जे यांच्या मनात आणि जे राज्याच्या मनात आहे तेच मी करेन असं उद्धव ठाकरे म्हणाले.

राज्याच्या जनतेच्या मनात जे आहे ते होऊ नये मराठी माणसाची शक्ती एकत्र येऊ नये म्हणून यांच्या मालकाचे नोकर इकडे गाठी भेटी घ्यायला लागले, हॉटेलमध्ये भेटत आहेत.मालकांचे नोकर तुम्ही जर का मुंबईवर तुम्हाला ताबा मिळाला नाही, पुन्हा मुंबई मराठी माणसाच्या ताब्यात गेली तर मालकाच्या मित्राचं कसं होणार, अदानीचं कसं होणार त्याच्यामुळं शेठजींचे नोकर, आणि शेठजींच्या नोकरांचे नोकर जे आज नालायकपणे वर्धापन दिन साजरा करत आहेत. अरे तुला काय करायचं तुला नाही होत, आमचं काय करायचं ते आम्ही बघू, असं आव्हान उद्धव ठाकरे यांनी दिले.

जर तुम्ही शिवसेनाप्रमुखांचा ब्रँड तुम्ही पुसून टाकणार असाल तर महाराष्ट्राच्या धरतीवरुन तुमचं नाव पुसून टाकणार आहोत. भाजपचं नामोनिशान पुसून टाकू, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला.

माझी तयारी तुम्हाला सांगतो, १९९२-९३ साली दंगा झाला होता.देशद्रोह्यांच्या विरुद्ध शिवसैनिक रस्त्यावर उतरले होते. त्यावेळी एक व्यक्ती बाळासाहेब ठाकरेंकडे आली होती, अशी आठवण उद्धव ठाकरे यांनी सांगितली. गद्दारांसमोर उभा आहे व मी म्हणतोय...कमॉन किल मी, तुम्ही अंगावर येणार असाल तर ॲम्ब्युलन्स घेऊन यायचं, येताना सरळ याल जाताना आडवे व्हाल, असा इशारा देखील उद्धव ठाकरे यांनी दिला.

आपल्याला भांडून चालणार नाही. मुंबईत हिंदू- हिंदूमध्ये मारामाऱ्या लावायच्या, हिंदी सक्ती करायची असेल तर देवेंद्र करुन बघा, ज्या हिंदी लोकांना १९९३ मध्ये वाचवलं, त्यांना आपल्या विरुद्ध उभं करतात. हिंदी सक्तीवरुन मुंबईत मराठी अमराठी वाद लावायचा आणि ते भ्रष्टाचार करायला मोकळे असं उद्धव ठाकरे म्हणाले.

## आपला मेळावा बाळासाहेबांच्या विचारांचा, तर दुसरा मेळावा सत्तेसाठी लाचार झालेल्यांचा, एकनाथ शिंदेंचा ठाकरेंवर हल्लाबोल




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आपला मेळावा हा बाळासाहेबांच्या विचारांचा आहे. तर दुसरा मेळावा हा सत्तेसाठी लाचार झालेल्यांचा आहे असे म्हणत सुरुवातीलाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना ठाकरे गटावर हल्लाबोल केला. हिंदुत्वाचा भगवा आपल्याकडे आहे. शिवधनुष्य आपल्याकडे आहे आणि जनतेचा आशिर्वाद देखील आपल्याकडे आहे असे एकनाथ शिंदे म्हणाले. आपल्या पक्षात जी वाढ होतेय ही सर्वांच्या मेहनीची आहे. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण याचेच हे प्रतिबिंब असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

बाळासाहेबांनी आयुष्यभर ज्या काँग्रेसचा विरोध केला. मात्र या लोकांनी शिवसेना काँग्रेसच्या दावणीला बांधण्याचे काम केल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. महाराष्ट्राचा विश्वासघात केल्याची टीका एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटावर केली. मुख्यमंत्रीपदासाठी झाले लाचार ते काय होणार बाळासाहेबांचे वारसदार असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी थेट उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला. सत्तेच्या खुर्चीसाठी कधीही आम्ही तडजोड करणार नाही असे एकनाथ शिंदे म्हणाले. हिंदुत्वाची आम्ही कधी प्रतारणा करणार नाही वचन आम्ही दिल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. काही लोकांना निवडणुका आल्यावर कार्यकर्त्यांची आठवण येते. एरव्ही हम दो हमारे दो असे म्हणत शिंदेंनी ठाकरेंवर टीका केली.

बाळासाहेबानंतर तुम्ही मराठी माणसांसाठी काय केले? याचा हिशोब द्या असे म्हणत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंना सवाल केला. आता म्हणतात आम्ही हिंदुत्व सोडलं नाही मग बाळासाहेबांना हिंदूहृदयसम्राटतुम्ही का म्हणत नाही असा सवाल देखील एकनाथ शिंदे यांनी केला. हिंदुत्व आमचा श्वास आहे असे एकनाथ शिंदे म्हणाले. भाषणात उद्धव ठाकरे म्हणाले कमॉन कील मी पण मी म्हणतो मेलेल्या माणसाला काय मारणार. महाराष्ट्राच्या जनतेनं विधानसभेच्या निवडणुकीत तुमचा मुडदा पाडलेला आहे अशी टीका एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली. वाघाच कातडं पांघरुन लांडगा वाघ होत नाही असे एकनाथ शिंदे म्हणाले. त्यासाठी वाघाचा काळीज आणि मनगटात जोर लागतो असे एकनाथ शिंदे म्हणाले. तो दम शिवसैनिकात आहे. आमच्या नादाला तुम्ही लागू नका. तुमचा चांगा पलटी घोडं फरार आम्ही केलं आहे. बाळासाहेबांचा आणि आनंद दिघेंचा सच्चा कार्यकर्ता मी असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

पाकड्यांनी आपल्या निष्पाप पर्यटकांचे बळी घेतले. त्यानंतर आम्ही त्यांच्या कुटुंबियाचे सात्वंन करण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी तुम्ही कुठे गेला होतात असा सवालही ठाकरे गटाला एकनाथ शिंदे यांनी केला. २० मिनीटात पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानला धडा शिकवल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. कितीही हामले झाले तरी या देशाचे पंतप्रधान म्हणाले ईट का जवाब गोली से देंगे असे एकनाथ शिंदे म्हणाले. आपल्या लष्करी सेनेबद्दल आम्हाला अभिमान आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाही आम्हाला अभिमान असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. बाळासाहेब असते तर त्यांनी देखील मोदींना शाबासकी दिली असलती असेही एकनाथ शिंदे म्हणाले. विरोधक भारतीय लष्कराच्या कार्यक्षमतेवर संशय घेत आहेत. आपल्या लष्करावर अविश्वास दाखवणे हा देशद्रोह असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. पण आपल्या सैन्यानी दहशतवादाचे अड्डे उध्वस्थ केले, सामान्य लोकांवर कुठेही हल्ला केला नाही असे एकनाथ शिंदे म्हणाले.

पाकिस्तानात राहुल गांधी व्हायरल होत आहेत. भारताविरोधात बोलून पाकिस्तानात हिरो झाला पण भारतात तुम्ही झिरो झालात अशी टीका एकनाथ शिंदे यांनी राहुल गांधी यांच्यावर केली. पाकिस्तानचा बुरखा टराटरा फाडण्याचे काम भारताच्या शिष्टमंडळाने जगभरात केल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. एका शिष्टमंडळाचे नेतृत्व श्रीकांत शिंदे यांनी करण्याची संधी मिळाली याचा मला अभिमान असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. शिवसेनेचे दोन खासदार जगभरात भारताचे नेतृत्व करता ही छोटी गोष्ट नसल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. मोदीजींनी श्रीकांत शिंदेंना नाव दिले आहे भाऊ. हे श्रीकांतचे श्रेय नाहीतर सगळ्या शिवसैनिकांचे असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. मोदीजींना मी मनापासून आभार मानतो. त्यांनी दोन खासदारांना शिष्टमंडळात संधी दिली. एनडीएमध्ये आपल्या शिवसेनेचे किती महत्वाचे स्थान आहे मोदीजींनी अधोरेखीत केल असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. मी श्रीकांत शिंदे यांना म्हणत होतो की तुझ्या बापाने चालू सरकार पाडलं आहे. तू भीवू नको असे मी सांगत होतो असे एकनाथ शिंदे म्हणाले. मी डॉक्टर नसलो तरी मोठमोठे ऑपरेशन करुन टाकतो असे एकनाथ शिंदे म्हणाले. आर आर पाटील गृहमंत्री असताना सभेत माझ्याबद्दल आणि श्रीकांतबद्दल बोलले होते. श्रीकांत हाडे जोडण्याचे काम करतो असे एकनाथ शिंदे म्हणाले.

शिवसेना ठाकरे गटाचा जीव हा मुंबई महापालिकेच्या तिजोरीत आहे अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केली. तुम्हाला मुंबईचा लढा आता आठवला. सत्तेत असता तुम्हीच तिजोरी फोडल्याची टीका एकनाथ शिंदे यांनी केली. लढा देण्यासाठी आधी घराबाहेर तर पडा असेही एकनाथ शिंदे म्हणाले. मुंबई महाराष्ट्राची होती, आहे आणि राहिल. कुणाचा बाप जरी आला तरी मुंबई महाराष्ट्रापासून तुटणार नाही. मुंबईचे महत्व कधीही कमी होणार नाही असे एकनाथ शिंदे म्हणाले.

# संत बाळूमामांच्या पालखीचे निफाड नगरीत स्वागत

## ढोल ताशांच्या गजरात, भंडाऱ्याची उधळण करत मुख्य रस्त्यावरून भव्य मिरवणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील बोकडदरे येथून बाळूमामांच्या मेंढ्या व पालखी क्रं.१चे निफाड नगरीत दि.१८रोजी सकाळी दहा वाजता आगमन झाले, पालखीचे शांतीनगर चौफुली येथे टाळ मृदुंग व ढोल ताशाच्या गजरात स्वागत करण्यात आले असून गावातील मुख्य रस्त्यावरून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली होती.

याप्रसंगी गावातील महिला भगिनींनी ठीक ठिकाणी संत बाळूमामांच्या प्रतिमेचे व पालखीचे पुजन करून आशीर्वाद घेतले ,पालखी मिरवणुकीत महिला भगिनींनी डोक्यावर कलश व तुळस घेऊन बाळूमामाच्या नावाचा गजर करत भक्तीमय वातावरणामध्ये स्वतःला धन्य करून घेत होते, बाळूमामांच्या



भक्तगणांनी भंडाऱ्याची उधळण करून नाचत होते, याप्रसंगी भाविक भक्तांनी बाळूमामाचे दर्शन घेऊन समाधान व्यक्त केले.

बाळूमामा चा पालखी सोहळा नांदुर्डी रोड क्रीडा संकुल जवळ आवळा नगर येथे थांबला असून येथे चार ते पाच दिवस त्यांचा मुक्काम असणार आहे दररोज नित्यनिमाने सकाळ संध्याकाळ संत बाळूमामाची आरती होणार असून त्यानंतर भाविक भक्तांना प्रसादाचे वाटप करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

संत बाळूमामाचे मेंढ्यांचे व पालखीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी यावेळी मोठी गर्दी केली होती संत बाळूमामांचे कोल्हापूर जिल्ह्यात आदमापूर येथे भव्य मंदिर असून या ठिकाणी भाविक भक्तांना राहण्याची व प्रसादाची सोय करण्यात आलेले आहे संत बाळूमामाच्या मेंढ्यांचा व पालखीचा महाराष्ट्रभर बाराही महिने प्रवास सुरू असतो यावेळी ठिकठिकाणी त्यांचे स्वागत केले जाते या पालखी सोहळ्यासाठी शिवाजी राजे ढेपले, नगरसेवक किशोर ढेपले, ज्ञानेश्वर कांदळकर ,धनंजय शेंद्रे भाऊसाहेब साबळे, राहुल ढेपले, बाळासाहेब मोगरे, नवनाथ जाधव, सचिन गवळी ,बबलू काळे, देविदास जाधव, आदी भक्त जणांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या निमीत्ताने श्री क्षेत्र आळंदी ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचे घेतले दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आज गुरूवार दि.१९/०६/२०२५ रोजी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराह आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या निमीत्ताने श्री क्षेत्र आळंदी ज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. आषाढी वारीला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेत अनन्यसाधारण महत्त्व आहे. लाखो वारकरी पालखी सोहळ्यां सोबत दरवर्षी पंढरपूरच्या विठ्ठलाच्या भेटीसाठी पायी चालत जातात. हा सोहळा केवळ एक धार्मिक यात्रा नसून, तो सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि भक्तीचे प्रतीक आहे व सोहळा प्रस्थाना दिवशी मनोभावे दर्शन झाले. दर्शनानंतर श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर सहअध्यक्ष ह.भ.प. श्री ग़हीनीनाथ महाराज औसेकर व सदस्य श्री संभाजीराजे शिंदे यांचा सन्मान श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ सुरू शांतीनाथ यांच्या व विस्वस्त श्री चैतन्य केशवराव लोंढे (कबीरबुवा)



यांच्या हस्ते श्री फळ व पुष्प हार घालून करण्यात आला. त्यावेळी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विस्वस्त श्री राजेंद्र बाबुराव उमाप विश्वस्त श्री पुरूषोत्तम मुरलीधर पाटील, विश्वस्थ व पालखी सोहळा प्रमुख डॉ भावार्थ रामचंद्र देखणे व कर्मचारी उपस्थित होते.

# शाळांच्या व्यवस्थापन समितींकडून ठराविक विक्रेत्यांद्वारे साहित्य खरेदीची सक्ती का?




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

जिल्ह्यातील शाळांमध्ये प्रवेशाच्या वेळी पालक आणि विद्यार्थी यांच्यावर शालेय साहित्य, वह्या, पुस्तके आणि गणवेश ठराविक विक्रेत्याकडूनच खरेदी करण्याची सक्ती केली जाते. हा शाळेचा अट्टाहास का,अशी सक्ती करू नये. पालकांना जिथुन वाटेल तिथे.. शालेय साहित्य, गणवेश खरेदी करून द्यावे या सक्तीविरोधात हिंदु जनजागृती समितीच्या 'सुराज्य अभियाना'च्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालत नायब तहसीलदार नरेंद्र जगताप यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की १. छत्रपती संभाजीनगर, जळगाव आणि देहली येथील जिल्हाधिकार्यांनी अशा शालेय साहित्य सक्तीविरोधात परिपत्रक काढले असून या प्रकारांना आळा बसण्यासाठी नाशिक जिल्ह्यातही तात्काळ, तसेच आदेश काढण्यात

### सुराज्य अभियान चे नाशिक जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन, खरेदीची सक्ती थांबण्याची मागणी

यावे तसेच २. पालकांनी कुठल्याही विक्रेत्याच्या सक्तीच्या दबावाखाली न येता त्यांच्या आवडीनुसार साहित्य खरेदी करणे हा त्यांचा मूलभूत हक्क असून निवेदनात अशा एकूण ११ मागण्या करण्यात आल्या आहेत त्यात सक्ती करणार्या शाळांवर दंडात्मक कारवाई, संबंधित आदेश शाळांच्या फलकावर लावणे, तपासणी दौरे आणि हेल्पलाइन चालू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

चौकट

नायब तहसीलदार नरेंद्र जगताप म्हणाले की'' पालक आणि विद्यार्थी हिताच्या या मागण्या आहेत, तरी मी नक्कीच कारवाई करीन. त्यांनी विद्यार्थ्यांच्या हितासाठी अन्य काही विषयांवरही या वेळी सविस्तर चर्चा केली.

या प्रसंगी निवेदन देतांना सुराज्य अभियानच्या अमोल शिंदे आनंद खेडेकर, नितीन मोडक कु. प्रियंका शिंदे कु प्राजक्ता खेडेकर उपस्थित होत्या.

# मनपा एन विभागातील प्रभाग क्र.१२७ मधील रामनगर अ मधील वस्ती स्वच्छता योजना फक्त नावापुरती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : मुंबई महानगरपालिकेची 'वस्ती स्वच्छता योजना'असतानाही घाटकोपर पश्चिम प्रभाग क्रमांक १२७ मधील रामनगर(अ)मध्ये दिवसेंदिवस घाणीचे साम्राज्य पसरत आहे.त्यामुळे काम न करणाऱ्या संस्थांच्या पाठीवर मनपा एन विभाग घन कचरा व्यवस्थापन विभागातील अधिकाऱ्यांची मात्र शाबासकीची थाप मिळत आहे का?असा प्रश्न याठिकाणी उपस्थित होत आहे.मुंबई महापालिकेच्या 'वस्ती स्वच्छता योजने'च्या नावाखाली स्वच्छतेची थातूरमातूर देखाव्यापुरती कामे करून या योजनेतून मिळणारा मलिदा लाटण्याच्या प्रकारामुळे घाटकोपर पश्चिम प्रभाग क्रमांक १२७ मधील राम नगर(अ)येथील परिसरात घाण आणि दुर्गंधीचे साम्राज्य वाढले आहे.आश्चर्य म्हणजे आपल्या भागात स्वच्छताच होत नसल्याची येथील रहिवाशांची तक्रार असताना पालिकेच्या अधिकाऱ्यांनी मात्र या भागात वस्ती स्वच्छता योजनेअंतर्गत उत्तम काम होत असल्याचा शेरा देत ही योजना राबविणाऱ्या संस्थांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली आहे. झोपडपट्टीत साफसफाई,घराघरांतून कचऱ्याचे संकलन,छोटी गटारे,आदींची स्वच्छता करण्याकरिता पालिकेतर्फे ही योजना राबविली जाते.यात प्रत्येक १० हजार घरांमागे एका संस्थेला वस्तीच्या स्वच्छतेची जबाबदारी सोपविली जाते. सामाजिक किंवा त्या-त्या भागात काम करणाऱ्या संस्थांनी आपल्या वस्तीच्या स्वच्छतेकरिता पुढाकार घ्यावा या हेतूने हे योजना राबविली जाते.त्यात प्रत्येक सफाई कामगाराला ७ हजार रुपये इतके वेतन पालिका अदा करते.आणि दत्तक वस्ती स्वच्छता योजना चालवणाऱ्या संस्थेला पालिका एकूण ५० हजार इतके

### वस्ती स्वच्छता योजनेचा निधी ठेकेदाराच्या खिशात

दरमहा वेतन देते.१० हजार कुटुंबाच्या वस्तीकरिता १४ व्यक्तींची नियुक्ती करून संस्थांनी वस्तीच्या स्वच्छतेची सर्व कामे करून घ्यावी,असे या योजनेत अपेक्षित आहे आहे.मात्र गंभीर म्हणजे १४ कामगारांऐवजी तीन किंवा चारच कामगार नेमून त्यांच्याकडून संपूर्ण वस्तीच्या स्वच्छतेचे काम उरकले जाते.उरलेले कामगार केवळ कागदावर दाखवून त्यांच्या वेतनाची रक्कम ठेकेदाराने खिशात टाकायची असा सगळा उद्योग सुरू प्रभाग क्रमांक १२७ मधील रामनगर (अ) मध्ये सुरू आहे.यामुळे वस्तीत स्वच्छतेची कामे होत नसल्याने कित्येक ठिकाणी ही योजना कागदावरच आहे.तरीही मनपा एन विभाग घन कचरा व्यवस्थापन विभागाचे अधिकारी अशा संस्थांच्या कामाचे कौतुकच करत आहे. रामनगर(अ)विभागात लोकवस्ती मोठ्या प्रमाणावर आहे.येथील संपूर्ण विभाग हा झोपडपट्टीचा आहे.परंतु कमी कामगार नेमून काम भागवून नेण्याच्या संस्थांच्या गैरप्रकारांमुळे या भागातील कचरा रोजच्या रोज उचलला जात नाही.त्यामुळे जागोजागी छोटी गटारे आजही तुंबडलेल्या स्थितीत असून सर्व कचरा व नाल्यातील सांडपाणी रस्त्यावर येत आहे.याचा परिणाम येथील स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर होताना दिसत असून,विभागात सर्वत्र दुर्गंधी पसरत असल्याची रहिवाशांची तक्रार आहे.येथील रहिवाशांना स्वच्छतेअभावी या सर्व त्रासाला तोंड द्यावे लागत असताना काम करणाऱ्या संस्थांना मात्र प्रशस्तिपत्रक दिले जात आहे,याबद्दल येथील स्थानिक रहिवाशी यांनी संताप व्यक्त केला आहे.

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचा जल्लोष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालयात सोमवार दिनांक १६ जून २०२५ रोजी शाळेचा पहिला दिवस म्हणून संस्थेचे संस्थापक कै. पंचप्पा कल्याणशेट्टी व शिक्षणाची जननी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक मराठी, कन्नड व सेमी इंग्रजी माध्यमाच्या सर्व मुलांना संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी व विज्ञान विभाग प्रमुख सौ पूनम कोकळगी यांनी औक्षण केले. त्यानंतर गुलाबपुष्प व चिक्की, चॉकलेट देऊन सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

**शाळेचा पहिला दिवस म्हणून संपूर्ण शाळा सजवले होते. गेटवर सुंदर रांगोळी, दर्शनी भागात रंगीबेरंगी फुगे लावले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व आनंद दिसून आला. शेवटी इ.५ वी ते ८ वी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आले.**

तद्नंतर विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहात व आनंदात शाळेत प्रवेश केला. यावेळी शासनाकडून आलेले पाठ्यपुस्तक सर्व विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.



यावेळी संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, शिक्षण विभाग प्रमुख सौ रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप आदी मराठी, कन्नड, सेमी विभागाचे सर्व शिक्षक उपस्थित होते.

## भाविकांच्या वैद्यकीय मदतीसाठी खास ॲपची निर्मिती

## हृदयविकार ग्रस्तांसाठीही विशेष सुविधा; भाविकांना मिळणार दिलासा

# मानाच्या दहा पालख्यांतील भाविकांना '१०८'च्या १०० रुग्णवाहिका देणार सेवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (दि.१९) :- आषाढीवारी साठी पालखी सोहळ्यासोबत पायी चालत येणाऱ्या वारकरी भाविकांसाठी शासनाचा १०८ अत्यावश्यक वैद्यकीय सेवा विभाग व राज्य आरोग्य विभाग यांनी संयुक्तपणे यंदा वारीसाठी मोठ्या प्रमाणात आरोग्य सेवा उभारली आहे. यावर्षी प्रथमच १० मानाच्या पालखी सोहळ्यांसोबत १०० पेक्षा अधिक रुग्णवाहिका सज्ज करण्यात आल्या आहेत. काही रुग्णवाहिका कार्डियाक (हृदयविकार ग्रस्तांसाठी) सुविधा असलेल्या रुग्णवाहिकांचा यात समावेश आहे.

यंदा आषाढी वारीमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक रुग्णवाहिकेत एक डॉक्टर व चालक सज्ज राहणार असून, त्यांच्याजवळ अत्यावश्यक






औषधाचा मुबलक साठा उपलब्ध राहणार आहे देहू ते पंढरपूर (जगदगुरु संत तुकाराम महाराज), आळंदी ते पंढरपूर (संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज), सासवड ते पंढरपूर (संत श्री सोपानकाका महाराज) आणि इतर सात मानाच्या पालख्यांबरोबर १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करण्यात आल्या असल्याची माहिती सोलापूर जिल्हा व्यवस्थापक डॉ. अनिल काळे यांनी दिली

तसेच आरोग्य विभागाने यावर्षी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवीत 'समारिटन' नावाचे मोबाइल ॲप्लिकेशन सुरू केले आहे. या ॲपच्या माध्यमातून वारकऱ्यांना आपत्कालीन वैद्यकीय मदतीसाठी त्वरित संपर्क साधता येणार आहे. ॲपवर आलेल्या माहितीवरून रुग्णवाहिका चालकाला रुग्णाचे ठिकाण अचूक कळणार. यामुळे वारीतील रुग्णांना वेळेवर वैद्यकीय मदत मिळून रुग्णाच्या जीवितास धोका कमी होण्यास मदत होणार आहे. 'समारिटन' हे ॲप शासनाच्या आरोग्य विभाग आणि एसपीईआरओ या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने विकसित करण्यात आले आहे. ॲपल स्टोअर आणि गुगल प्ले स्टोअरवरून ते मोफत डाउनलोड करता येते. या ॲपमुळे केवळ रुग्णवाहिकेशी संपर्कच साधता येणार नाही, तर प्राथमिक उपचाराची माहितीही यामध्ये दिली आहे. त्यामुळे रुग्णवाहिका पोहोचण्यापूर्वी रुग्णाला काही आवश्यक मदत दिली जाऊ शकते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने व १०८ चे मुख्य अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर शेळके यांच्या मार्गदर्शनाखली जिल्ह्यात वारकरी -भाविकांना पालखी मार्ग, तळांवर तसेच पंढरपूर शहरात आरोग्य सुविधा देण्यात येणार असल्याचेही डॉ. काळे यांनी सांगितले.

रुकमाई सभागृह पोलीस संकुल, पंढरपूर येथे 'समारिटन' मोबाईल ॲप तसेच कार्डिओपल्मोनरी रिसक्सिटेशन (सीपीआर) या बाबतचे प्रशिक्षण पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, पोलीस निरिक्षक विश्वजीत घोडके, पुणे जिल्हा व्यवस्थापक डॉ. प्रियांक जावळे, प्रशिक्षक डॉ. साक्षी पोटदुखे, डॉ.वैभव भिंगारे, १०८ चे सहा.व्यवस्थापक सुनिल चव्हाण, दिलीप शिंदे तसेच पोलीस अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## थोडक्यात...

### भरधाव वेगात वाहन चालवून अपघात ; वाहन चालकावर गुन्हा दाखल

सोलापूर (प्रतिनिधी) भरधाव वेगाने वाहन चालवून अपघात करून दुखापत केल्याप्रकरणी वाहन क्रं.एम एच.११.ए.डब्लू.२७२६ यातील चालक याच्याविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १४ जून रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास विजापूर रोड सोलापूर हायवे रस्त्यावर घडली. याप्रकरणी सिद्धाराम अशोक पारेकर (वय-३०,रा.मुक्काम पोस्ट औराद, तालुका दक्षिण सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की फिर्यादी व हुसेनबाशा बाबूलाल सय्यद हे दोघे फिर्यादी यांच्या दुचाकी क्रमांक एमएच.१३. डीएस.८४०८ या वरून बसून जात असताना वळकबाळ येथे विजापूर रोड हायवे रोडने कुलकर्णी तांडा मार्गे कुमठा गावाकडे जात असताना फिर्यादी यांनी इंडिकेटर व उजवा हात दाखवून दाखवला असताना वरील संशयित वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून फिर्यादी यांना धडक देऊन दुखापत करत जखमी होण्यास कारणीभूत ठरला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मुंबई चे पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष राजेंद्र कोरके-पाटील उत्कृष्ट संघटक पुरस्काराने सन्मानित

## मराठवाडास्तरीय रौप्य महोत्सवी अधिवेशन आणि मराठवाडा भूषण पुरस्कार सोहळा २०२५

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चे पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष सन्माननीय राजेंद्रजी कोरके -पाटील यांना उत्कृष्ट संघटक या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले नुकत्याच संभाजीनगर येथे महाराष्ट्र झालेल्या संघाच्या कार्यक्रमांमध्ये हा पुरस्कार त्यांना देण्यात आला आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई म राठवाडा विभागांच्यावतीने पत्रकार संघाचे मराठवाडास्तरीय रौप्य महोत्सवी अधिवेशन आणि मराठवाडा भूषण पुरस्कार सोहळा २०२५ हा कार्यक्रम श्री एकनाथ रंगमंदिर उस्मानपुरा संभाजीनगर या ठिकाणी संपन्न झालेल्या कार्यक्रमात देण्यात आला.



पंढरपूर शहरामध्ये या पत्रकार संघाच्या वतीने सन २०२० वीस पासून संघाची बांधणी अनेक सामाजिक धार्मिक सांस्कृतिक उपक्रम राबवण्यात आले त्याचप्रमाणे थोर संत थोर राष्ट्रपुरुष राष्ट्रीय १५ आगस्ट २६ जानेवारी १ मे ९ ऑगस्ट क्रांती दिन दत्त जयंती यासारख्या दिनी खाऊ वाटप वृक्षरोपण शालेय साहित्य वाटप असे अनेक कार्यक्रम राबवण्यात आले.

सन मार्च २०२२ मध्ये सर्वांसाठी जीव घेणा असा आ- लेला कोरोनामध्ये आमच्या संघाच्या वतीन महत्वपूर्ण योगदान देऊन त्या करुणांमध्ये बंदोबस्तामध्ये असणाऱ्या पो- लीस बांधवांना चहा पाण्याची बॉटल बिस्कीट पुढे चे वाटप या संघाच्या वतीने करण्यात आले या सर्व सामाजिक कार्य संघाचे पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष सन्माननीय राजेंद्रजी कोरके- पाटील त्यांच्या मार्गदर्शनाखाली संघाच्या असंख्य पत्रकार बांधवांनी राबवले याच कार्यक्रमाचे दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई यांनी महाराष्ट्र राज्य पश्चिम संघाचे अध्यक्ष सन्माननीय राजेंद्र जी कोरके-पाटील यांना उत्कृष्ट संघटक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य सरचिटणीस श्री डॉक्टर विश्वासराव आरोटे महाराष्ट्र प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव महाराष्ट्र राज्य प्रदेश उपाध्यक्ष नितीन शिंदे आधीसह संघाचे वरिष्ठ पदाधिकारी व सर्व पत्रकार बांधव उपस्थित होते हा पुरस्कार करके -पाटील यांना प्राप्त झाल्याने यांचे पंढरपूर शहर अध्यक्ष संतोष मोरे कार्याध्यक्ष रामदास नागटिळक तालुकाध्यक्ष रवी कोळी नागेश आदापुरे कुमार कोरे राजेंद्र करपे राजाभाऊ आटकळे धनाजी राक्षे ह भ प राजेश बादले महाराज आदीसह पंढरपूर शहरातील सर्व व्यापारी प्रतिष्ठित मान्यवर मंडळींनी त्यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील सामाजिक कार्यास व वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मिरॅकल फाउंडेशन व्यसनमुक्ती केंद्राचे क्षयरोग मुक्त भारत अभियानासाठी मोलाचे सहकार्य





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत 'क्षयरोग मुक्त भारत अभियान' निक्षय शिबीरांचे आयोजन भारतभर करण्यात येत आहेत.या शिबिरात जोखमीच्या व्यक्ती म्हणजेच वृद्धाश्रम,अनाथाश्रम,व्यसनम ुक्ती केंद्र,ज्येष्ठ व्यक्ती,मधुमेहि व्यक्ती,बीएमआय कमी असलेल्या व्यक्ती,टी बी रुग्णांचे सहवासित अशा सर्वांची या शिबिरात तपासणी करून क्षयरोग रुग्ण शोधून त्यांचेवर उपचार करणे. हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.याच अभियानाचा भाग म्हणून पालघर जिल्हा क्षयरोग केंद्र अधिकारी डॉ.शशिकांत साळुंके यांच्या मार्गदर्शनात वैद्यकीय अधिकारी डॉ.सुरभी म ाजगावकर आणि त्यांचे सहकारी तंत्रज्ञ यांच्या अधिपत्याखाली मिरॅकल फाउंडेशन व्यसनमुक्ती केंद्र,चांदीप,विरार (पूर्व) येथे दाखल असलेल्या व्यक्तींची क्षयरोग चाचणी (CY-TB TEST) व एक्स-रे काढण्यात आले.यासाठी वसई तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अंतरा सोनी आणि त्यांचे क्षयरोग पथक (ग्रामीण) यांच्यासोबत प्राथमिक आरोग्य केंद्र,पारोळ येथील डॉ. संकेत हेगडे व त्यांच्या आरोग्य सेविका, आरोग्य सेवक,आशा सेविका या सर्वांचे विशेष सहकार्य मिळाले.याप्रसंगी मिरॅकल फाउंडेशन येथे दाखल असलेल्या व्यक्ती व या ठिकाणी कार्यरत असलेला संपूर्ण स्टाफ अशा एकूण १०४ व्यक्तींची क्षयरोग चाचणी (CY-TB) आणि एक्स-रे घेण्यात आले.यावेळी मिरॅकल फाउंडेशन व्यसनमुक्ती केंद्राचे मानसोपचार तज्ज्ञ डॉ मनोहर यादव हे देखील उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी वसई तालुका क्षयरोग पर्यवेक्षक श्री.योगेश पाटील,मिरॅकल फाउंडेशन युनिट क्रमांक २ चे केंद्र प्रमुख श्री.पंकज कौरा,स्टाफ श्री.झीशान,श्री.अनिकेत व सम न्वयक श्री.रमेश सांगळे यांनी विशेष पुढाकार घेतला.

'क्षयरोग मुक्त भारत अभियान' या शिबिरामध्ये सहभागी होण्यासाठी मिरॅकल फाउंडेशनचे संस्थापक,अध्यक्ष श्री.सुभाष (बाबूजी) मनराय यांनी जिल्हा क्षयरोग केंद्र पालघर येथे पाठपुरावा केला.

# संत शिरोमणी सावता महाराजांच्या संजीवनी समाधी असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील आरणगावातील तीर्थक्षेत्रास अ दर्जा बहाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : संत शिरोमणी सावता महाराज यांच्या संजीवनी समाधी असलेल्या सोलापूर जिल्ह्या- तील अरण गावातील तीर्थक्षेत्रास अ दर्जा बहाल केला आहे. अशी माहिती ग्रामविकास मंत्री व सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुम ार गोरे यांनी दिली.



या ठिकाणी समाधी मंदिर व परिसराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी भूमी अधिग्रहण, संरक्षण भिंत, मंदिर दुरुस्त व अन्य विकास कामाचे मंजुरी दिली आहे

या कामासाठी शिखर समितीचे मान्यता मिळवण्याची जाहीर करत संबंधित प्रस्ताव तातडीने पाठवून आराखड्यास अंतिम रूप देणे ची निर्णय गोरे यांनी दिले.

अरे तुझ्या महत्वपूर्ण बैठकीस प्रधान सचिव एकनाथ डबले, मंदिर स्वतःचे प्रमुख ह.भ.प. सावता महाराज वशेकर आणि ह. भ. प. प्रभू महाराज माळी, आबासाहेब खरे अमर हजारे दशरथ बनकर प्रत्यक्ष उपस्थित होते सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद कार्यकारी अभियंता अजय भोसले, तसेच वास्तु विश्रांती हेमंत पाटील, दूरदृश्य प्रणाली द्वारे सहभाग घेतला.

# माळकोंडजी जिल्हा परीषद शाळेची सर्वांगीण विकासाकडे वाटचाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील म ाळकोडजी जिल्हा परिषद शाळेचा चेहरा मोहरा बदलला असुन ग्राम पंचातच्या अथक प्रयत्नातुन गाव विकासा सोबतच गाव च भविष्य असलेली अंगणवाडी व गावची जिल्हा परीषद शाळेचाही विकास झाला पाहीजे यासाठी शाळेतील शैक्षणिक व भौतीक विकासाला चालना देत शाळेचे सुंदर प्रांगण व क्रीडांगण शाळेतील मनमोहक झाडे हिरवळीने गजबजलेला सुंदर परीसर, शाळेची भव्य अशी ईमारत बोलक्या भिंती सह शाळेचा परीसर सि सि टि वी च्या नजरेत सोबतच




शाळेचा विकास च नव्हे तर शाळा गुणवत्ता व विद्यार्थी शैक्षणीक विकास याकडेही ग्रामपंचायतचे विशेष लक्ष असल्याच सरपंच जयशंकर विभुते यांनी सांगीतले ,यावेळी सरपंचांनी सांगितले की माळकोंडजी गाव व जिल्हा परीषद शाळा यांच्या विकासात्मक कामे औसा तालुक्याचे लोकप्रीय आ.अभिमन्यु पवार साहेबांच्या म ार्गदर्शनाखाली व त्यांच्या निधीतुन आम्ही विकास करु शकलो असही यावेळी सरपंचानी सांगितले. गाव व शाळा विकास करत असताना माळकोंडजी ग्रामस्थ शालेय व्यवस्थापण समिती व शाळेतील मुख्याध्यापक सह शिक्षक यांच्या विशेष सहकार्यातुन झाला आहे.

## सर्वत्र सखल भागात साचले पावसाचे पाणी

# पडघा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या प्रवेशद्वारावर साचले पाणी; रुग्णांची तारेवरची कसरत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या जोरदार पावसात अनेक सखल भागांत मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून भिवंडी तालुक्यातील पडघा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या प्रवेशद्वारा- वर पाणी साचलेले पाहायला मिळाले. मात्र,अनेक रुग्णांना , गरोदर महिला,लहान मुलांना पावसाच्या त्या पाण्यातुन किंवा बाजूच्या कठड्यावरून आपली वाट काढून रुग्णालयात जावं लागत आहे. पाणी साचल्या कारणाने रुग्णांना, डॉक्टरांना तसेच तेथील कर्मचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे.तर साचलेल्या पाण्याचा निचरा होण्यासाठी कोणतीही जागा नसल्याने त्याठिकाणी साचलेल्या पाण्यामुळे डास, माश्यांसारखे किडे होऊन रो- गराई पसरण्याचा धोका निर्माण होऊ शकतो अशी प्रतिक्रिया डॉक्टरांकडून वर्तवली जात आहे. तर पडघा आरोग्य केंद्र येथे पाणी साचलेला व्हिडीओ रणजित साळुंखे यांनी सोशल मीडियावर व्हायरल करत. स्थानिक लोकप्रतिनिधींनी याकडे नुसती बघायची भूमिका घेऊ नये. येणाऱ्या मतदानामध्ये पडघा येथील नागरिक तुम्हाला दारात उभे करणार नाहीत असा टोला देखील त्यांनी व्हिडिओच्या माध्यम ातून दिला आहे. तर यावेळी पडघा ग्रामपंचायतिचे सरपंच रवींद्र विशे, पडघा ग्रामपंचायत अधिकारी भास्कर घुडे यांनी पडघा आरोग्य केंद्रात धाव घेतली.तर पडघा ग्रामपंचायतीच्या वतीने जेसीबीच्या साह्याने पाणी बाहेर जाण्यासाठी मार्ग करून देण्यात आला.



**पडघा प्राथमिक आरोग्य केंद्राचा मुख्य प्रवेशद्वार आहे. याआधी काम करताना पाणी बाहेर पडण्यासाठी कोणतेही उपाययोजना त्या कामातून केलेली नाही. त्यामुळे त्या ठिकाणी पाणी साचतो. ग्रामपंचायतीच्या वतीने पाणी काढण्यासाठी दोन तास जेसीबी उभा होता. परंतु पाणी कोणत्या म ार्गाने काढावा याचा मार्गच दिसत नव्हता. त्या ठिकाणाची जागा खालच्या बाजूची असल्याने त्यामुळे पाणी बाहेर जाण्याचा मार्ग निघतोच का याल- ाही माझी सद्यातरी खात्री होत नाही. प्रत्यक्षात कामगार आल्यावर समपा- तळी तपासून पाणी निघतो का. याचा मार्ग आम्ही काढतो.**

**– पडघा ग्रामपंचायत अधिकारी भास्कर घुडे**

**या संदर्भात ग्रामपंचायत म ध्ये आधी पत्र व्यवहार केलेला आहे. रुग्णालयाच्या समोर पाणी साचल्याने रोगराई पसरू शकते, डेंग्यू सारखे आजार होऊ शकतात.**

**– पडघा वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रज्ञेश पाटील**

# शांतता झोनमध्ये कर्णकर्कश व मोठ्या आवाजात डी. जे. वाजविल्याबद्दल शिक्षा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहरातील शांतता झोन म्हणून संबोधला जाण- ारा छत्रपती शिवाजी महाराज चौकात विना परवाना डीजे वाजविल्या बद्दल वाजविणार्या आरोपीवर न्यायालयाच्या सुचनेनुसार पोलिस कार्यवाई करण्यात आली होती त्यानुसार न्यायालयाने सार्वजनिक ठिकाणी शांततेचा भंग केला म्हणून डीजे वाजविणार्यास शिक्षा सुनावली आहे.त्यामुळे विना परवानगी शांततेचा भंग करणाऱ्याना चांगलीच चपराक बसली आहे.

दिनांक १८ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, निफाड येथे एच ०६ ए.क्यु ९०९६ क्रमांकाचे आयशर ४०७ वाहन बेकायदेशीररित्या मोठ्या व कर्णकर्कश आवाजात डीजे वाजवत असल्याची निफाड न्यायालयाच्या लक्षात आल्याने कामात व्यत्यय येत असल्याने कोर्ट ड्युटीवर असलेल्या पोलीस नाईक कल्पना पवार यांनी त्यानुसार तत्काळ पो. हवा. खुळे, पो.कॉ. चकोर, पो.कॉ. सूर्यवंशी, पो.ना. सांगळे यांच्यासह घटनास्थळी जाऊन संबंधित वाहन रोखले. वाहन चालकाने दिलेल्या

### सार्वजनिक शांततेचा भंग करणाऱ्या आरोपीस न्यायालयाकडून चपराक

सूचनेकडे दुर्लक्ष करून डीजे मोठ्या आवाजात वाजवत राहिला. चौकशीत त्याचे नाव योगेश ज्ञानेश्वर वारुळे, वय ३१, रा. खडकमाळेगाव, ता. निफाड असे सांगितले. त्याच्याकडे डीजे वाजवण्यास कोणतीही वैध परवानगी नव्हती. त्याने बेकायदेशीररित्या डीजे वाजवून सार्वजनिक शांततेचा भंग केला म्हणून या प्रकरणी निफाड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करून, आरोपीस न्यायालयात हजर करण्यात आले.न्यायालयीन निर्णय दिनांक १९ जुन २०२५ न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग, निफाड शुभदा एस. सुकरे यांनी दोषी आरोपीस खालीलप्रमाणे शिक्षा सुना- वली:₹ १०००/- अक्षरी -एक हजार रुपये दंड,व ८ दिवसांची साधी कैद शिक्षा सूनवण्यात आली आहे सदर गुन्हा भारतीय न्यायसंहिता कलम २९२,३८,१३६,३३(१) (डि) महाराष्ट्र पो- लीस कायदा कलम १३१ , व मोटार वाहन कायदा कलम ११९/१७७ अंतर्गत नोंदवण्यात आला होता.पोलीस प्रशासनाकडून सर्वसामान्य नागरिकांना आवाहन करण्यात येते की, सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही प्रकारचा डीजे किंवा मोठ्या आवाजात स्पीकर वापरण्या अगोदर शासनाची परवानगी घ्यावी, अन्यथा कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.